जळगाव (प्रतिनिधी) दि. ३१ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कक्ष अधिकारी राजेश बागुल, डाटाएन्ट्री ऑपरेटर रविंद्र सोनवणे तसेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेले झेरॉक्स ऑपरेटर शिवाजी पाटील हे आज विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाले.

संलग्नता विभाग व प्रवेश पात्रता विभाग (अ.का.) येथील कक्ष अधिकारी राजेश बागुल, परीक्षा विभागातील (संगणक केंद्र) येथील डाटाएन्ट्री ऑपरेटर रविंद्र सोनवणे हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. तसेच परीक्षा विभागातील झेरॉक्स ऑपरेटर शिवाजी पाटील यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता